# :: सर्व शिक्षा अभियानाचे मूळ स्वरुप ::

शालेय व्यवस्थापनामध्ये समाजाच्या सक्रिय सहभागाव्दारे प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणेसाठी सर्व शिक्षा अभियान हा एक प्रयत्न आहे. संपूर्ण देशभरातून दर्जेदार शिक्षणाच्या होणा-या मागणीस हा एक प्रतीसाद आहे. सर्व शिक्षा अभियान असा एक कार्यक्रम आहे की ज्यामध्ये सर्व मुलांमधील मानवी क्षमतांचा विकास समाज/वस्तीच्या सहाय्याने, दर्जेदार शिक्षणाची संधी देवून करता येईल.

- अमंलबजावणसाठी आराखडाच का? मार्गदर्शक सूचना का नाही ?
- राज्य आणि केंद्ग शाशित प्रदेशातील जिल्हयानां स्थानिक वैशिष्टयपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी पूष्टी देणे शक्य व्हावे म्हणून.
- राष्ट्रीय धोरणाच्या व्यापक निकषानुसार स्थानिक गरजाभिमुख नियोजनास उत्तेजन देण्यासाठी.

व्यापक राष्ट्रीय निकष लक्षात घेता नियोजन ही एक अर्थपूर्ण प्रक्रिया बनविण्यासाठी.

स्थानिक संदर्भ लक्षात घेवून राज्यांनी आणि जिल्हयांनी त्यांची उदिष्टये व कालमर्यादा ठरवावी. मात्र सार्वत्रिकिकरणाचे उद्दिष्टये पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरून सन २०१० ही कालमर्यादा ठरविण्यात आली आहे. शक्यतो वेगवेगळया माध्यमांचा अवलंब करुन मुलानां शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यावर आणि ६-१४ वयोगटातील प्रत्येक मुलास ८ वर्षाचे शालेय शिक्षण उपलब्ध करुन देण्यावर या अभियानात भर देण्यात येईल. लिंगदरी आणि सामाजिक तफावत दूर करणे आणि शाळेतील मुलांची पूर्ण उपस्थिती टिकवूण गळती पूर्णपणे थांबविणे यावर विशेष भर राहील. या आराखडयाप्रमाणे कार्यवाही अंमलात आल्यास जीवन उपयोगी, जीवन विषयांशी निगडीत शिक्षण प्रकल्प कार्यरत राहातील. जेणेकरुन मुले आणि पालक यांना त्यांच्या नैसर्गिक व सामाजिक वातावरणात शालेय पध्दत उपयुक्त आणि पोषक वाटेल.

## <u>सर्व शिक्षा अभियान : एक आराखडा आणि एक कार्यक्रम</u>

- सर्व शिक्षा अभियानाचे दोन पैल्यू आहेत.
- प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी सर्व शिक्षा अभियान हा कार्यक्रम अनेक कार्यक्रमांच्या एकत्रिकरणाचा आराखडा पुरवितो.

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्टये साध्य करण्यास आवश्यक असणा-या बाबीनां बळकट करण्यासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याची सुविधा या अभियानात आहे.

राज्य आणि केंद्ग शासनाच्या प्राथमिक शिक्षणावरील सर्व योजनांकरीता, विभागवार केलेल्या सर्व गुतंवणूकीचा समावेश सर्व शिक्षा अभियानाच्या आराखडयात होईल. आणि पुढील कांही वर्षात त्यांचे विलिनीकरण सर्व शिक्षा अभियानात होईल. शिक्षणाच्या सार्वत्रिकिकरणासाठी एक कार्यक्रम म्हणून सर्व शिक्षा अभियानात वाढीव तरतूद अभिप्रेत आहे.

- सध्या सर्व शिक्षा अभियान हे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकिकरणाचा महत्वाचा कार्यक्रम म्हणून भारतामध्ये राबविला जात आहे. सर्व शिक्षा अभियानाचे मुख्य ध्येय पायाभूत सुविधा,टिकवणूक वाढविणे, लिंगदरी कमी करणे आणि शिक्षणातील सामाजिक दरी कमी करुन विद्यार्थ्यांची अध्ययन समृध्दी वाढविणे. सर्व शिक्षा अभियानामध्ये विविध उपक्रमाव्दारे सुविधा पुरविण्यात येतात - नवीन शाळा उघडणे, पर्यायी शिक्षण सुविधा, शाळा बांधकाम, शाळा खोली बांधकाम, स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याची सुविधा, शिक्षक प्रशिक्षण, विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके इत्यादी बालकांचा मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार ६-१४ वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीचा प्रवेश, उपस्थिती आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे बंधनकारक आहे. याव्दारे दर्जेदार शिक्षणाचा हक्क आहे. आम्ही अशी आशा करीतो की येणा-या काही वर्षात प्रत्येकासाठी प्राथमिक शिक्षण उपलब्ध करुन देवून राज्याचे साक्षरतेचे प्रमाण उंचावूण महाराष्ट्र देशात अग्रेसर राहील हे स्वप्न साकार होईल.

**नवीन शाळा उघडणे :-**

1) कलम ६ च्या प्रयोजनार्थ क्षेत्रे किंवा हद्दी :-

राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण पुढील निकषांची पूर्तता करण्यासाठी वस्तीनजीकच्या क्षेत्रामध्ये किंवा हद्दीच्या आत नजिकची शाळा स्थापन करील.

- क) इयत्ता १ ली ते ५ वी मध्ये शिकणा-या बालकांबाबत वस्ती नजीकच्या एक किमी जाणे योग्य अंतराच्या आत व ६-११ वर्षे वयोगटातील किमान २० बालके उपलब्ध असेल तेथे शाळा स्थापन केली जाईल.

2) ख) इयत्ता ६ ली ते ८ वी मध्ये शिकणा-या बालकांबाबत वस्ती नजीकच्या तीन किमी एवढया चालत जाणे योग्य अंतराच्या आत इयत्ता ६ वी मध्ये २० बालके उपलब्ध असतील तेथे शाळा स्थापन केली जाईल.

3) डोगराळ क्षेत्राच्या बाबतीत किंवा दुर्गम क्षेत्राच्य बाबतीत राज्य शासनास पोट-नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किमान अंतरामध्ये यथायोग्य बदल करता येईल आणि ज्यांना आपल्या शाळामध्ये पुढील प्राथमिक शिक्षण घेण्याची सुविधा नाही अशा त्या क्षेत्रामधील बालकांकरीता शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून चालविल्या जाणा-या शाळा उपलब्ध करुन देता येतील.

4) जेथे पोट-नियम (१) अंतर्गत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नजिकच्या शाळेच्या क्षेत्रामध्ये किंवा हद्दीच्या आत शाळा उपलब्ध नाही अशा , राज्य शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या लहाव वाडयामधील बालकांकरीता आणि नियम ४ (१) (क) च्या कक्षेत येणा-या बालकांकरीता राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण पोठ नियम(१) अतंर्गत विनिर्दिष्ट केलेल्या हद्दी शितील करुन, शाळेमध्ये प्राथमिक शिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ मोफत परिवहन, निवास सुविधा व अन्य सुविधा यांची पुरेशी व्यवस्था करील.

- अधित्तम लोकसंख्या असलेल्या क्षेत्रामध्ये (शहरी व निमशहरी क्षेत्रे) :- राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण, उक्त क्षेत्रातील ६-१४ वयोगटातील बालकांचे प्रमाण लक्षात घेवून एकापेक्षा जास्त नजीकच्या शाळा स्थापन करील.

**मोफत पाठयपुस्तके योजना : -**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठय पुस्तके योजनाही जिल्हा परिषद/नगर परिषद/खाजगी अनुदानीत शाळांतील इयत्ता १ ली ते ८ वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी आहे.

मार्च / एप्रिल महिन्यात बालभारती पाठय पुस्तक भांडाराकडे मागणी नोंदवली जाते. मे महिन्यात पाठय पुस्तकांचा पुरवठा केला जातो. शाळेच्या पहिल्याच दिवशी पात्र सर्व विद्यार्थ्यांना पाठय पुस्तकांचे समारंभा पुर्वक वितरण केले जाते.

❖ सन २०१८-१९ मध्ये जिल्हयातील ---------- विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठयपुस्तकाचे वितरण करण्यात आलेले आहे.

**गणवेश योजना : -**

सर्व शिखा अभियानांतर्गत जिल्हा परिषद/नगर परिषद(खाजगी स्वराज्य)शाळांतील इयत्ता १ ली ते ते ८ वी च्या सर्व मुली,अनु.जाती,अनु.जमातीची मुले व दारिद्गय रेषेखालील पालकांची मुले यांचेसाठी शाळा व्यवस्थापन समितीकडे प्रति विद्यार्थी रुपये ६००/- दोन गणवेश संचासाठी निधी मंजूर आहे.

❖ सन २०१८-१९ मध्ये ७३३१४ विद्यार्थ्यांसाठी शाळा व्यवस्थापन समितीकडे प्रती विद्यार्थी ६००/- प्रमाणे ४,३९,८८,४००/- निधी माहे जून २०१८ मध्ये वर्ग करण्यात आला आहे.

**मुलींचे शिक्षण : -**

❖ मुलींचे शिक्षण उपक्रमांतर्गत शाळास्तरावर मीना राजू मंच सन २०११-१२ पासून स्थापन करण्यात आलेले आहेत. या उपक्रमा अंतर्गत प्रती वर्षी शाळास्तरावर लिंग समभाव,आरोग्य शिक्षण व्यक्तीमत्व विकास या उद्दीष्ठांसाठी दरमहा उपक्रम घेण्यात येतात.यासाठी प्रतीवर्षी राज्यस्तरावर महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण पुणे यांच्या वतीने प्रशिक्षण घेण्यात येते. जिल्हास्तरावर निवडक सुगमकर्ताचे व गटस्तरावर जिल्हयातील सर्व सुगमकर्ताचे प्रशिक्षण घेण्यात येते.

**<u>अध्ययन समृध्दी कार्यक्रम : -</u>**

❖ यामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांचे विषयज्ञान वाढण्यासाठी राज्यस्तरावर शैक्षणिक साहित्य विकसीत करुन शाळांना पुरवण्यात येते.

## <u>लोकजागृती : -</u>

राज्य शासन मागील दोन वर्षापासून शिक्षणामध्ये मोठया प्रमाणात मूलभूत सुधारणा करत आहे. त्याचा परिणाम १००% मुलांच्या शिकण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाच्या माध्यमातून होत आहे. शिक्षणात समता मूलक विचार अंगिकारण्याबाबत कार्य करत आहे. प्रत्यक माणूस शारिरीक पातळीवर भिन्न असू शकतो. परंतू विचाराच्या पातळीवर प्रत्येक माणसास आदर,प्रेम, वात्सल्य, विश्वास, समाधान याची सर्वांना समान गरज आहे. याबाबी समाजातील सर्व घटकास शिक्षणाच्या माध्यमातून पोहचविणे शक्य आहे. यामधूनच प्रत्येक बालकास सन्मानपुर्वक गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्याचे धेय साध्य होऊ शकेल. याकरिता शासकीय यंत्रणे बरोबर समाज सहभाग महत्वाचा आहे. समाजाच्या सहभागासाठी खालील प्रमाणे उपक्रम घेण्यात येतात.१) समता २) बेटी बचाओ बेटी पढाओ ३) शिक्षण हक्क कायदयावर चित्ररथ ४) शिक्षण मेळावा ५) शाळा प्रारंभोत्सव ६) प्रेरणासभा ७) तक्रार नियंत्रण यंत्रणेत सजगता आणण्यासाठी ऑनलाईन प्रणालीचे विकासन इत्यादी.

## <u>अपंग समावेशित शिक्षण : -</u>

- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील प्रकरण - २ भाग ३(२) नुसार नमुद असलेल्या अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ (समान संधी,हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अन्वये प्रकरण ५ मधील कलम २६(अ) नुसार राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांना प्रत्येक विशेष गरजा असणाऱ्या बालकांना वयाच्या १८ वर्षापर्यंत सुयोग्य व संचारमुक्त वातावरणात नियमित विद्यार्थ्यांसोबत शिक्षणाची समानसंधी देऊन मुख्य प्रवाहात आणणे व त्यांचे प्राथमिक शिक्षण पुर्ण करणे बंधनकारक आहे.

**लाभार्थी गट :-** १) अंशतः अंध, २)पुर्णतः अंध, ३) कर्णदोष , ४) अस्थिदोष, ५) मतिमंद, ६) बहुविकलांग, ७) मेंदूचा पक्षघात, ८) अध्ययन अक्षम, ९) स्वमग्न , १०) पार्किन्सन रोग, ११) मानसिक आजारपण,१२)कुष्टरोग मुक्त,१३)अतिशय लहान उंची,१४)बौद्धिक अक्षमता,१५)स्नायुंशी

संबधित आजार, १६)मज्जासंस्थेचे तीव्र आजार,१७)बहुविध उत्तक दृढन,१८)थेलेसीमिया, १९)हिमोफिलिया, २०)सिकल सेल रोग, व २१)अॅसीड हमला पिडीत

**योजनेचे स्वरुप :-** या योजनेअंतर्गत CWSN विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल करण्यासाठी १) शोध, २) औपचारिक कार्यात्मक वैदयकिय निदान व उपचार शिबीर, ३) शस्त्रक्रिया, ४) साहित्य आणि साधन/उपकरणे पुरवठा व दुरुस्ती, ५) ब्रेलपुस्तके,लार्ज प्रिन्ट पाठयपुस्तके पुरवठा, ६) मदतनिस,परिवहन भत्ता, ७) शिक्षक,पालक,तज्ञ प्रशिक्षण, ८) थेरेपी सेवा व ९) अध्यापनासाठी विशेष शिक्षक व विद्यार्थ्यांची निश्चिती अपंगत्वाची तिव्रता आणि झालेली प्रगती यावरुन १) नियमित वर्ग शिक्षकांमार्फत अध्यापन सहाय्य, २) विशेष शिक्षकांमार्फत गरजेनुरुप अध्यापन सहाय्य, ३)विशेष शिक्षकांमार्फत अतितिव्र स्वरुपातील विद्यार्थ्यांना पुर्णतः अध्यापन सहाय्य.

याप्रकारे समावेशित शिक्षणाकडून शिक्षणाकडे या उपक्रमांची प्रगती सुरु आहे. युडायस नुसार सन २०१८-१९ मध्ये ६७७९ विद्यार्थ्यांसाठी तरतूद मंजूर आहे.

- चालुवर्षी जिल्हा परिषद मार्फत विशेष उपक्रम राबविण्यात येऊन जिल्हयातील दिव्यांग विद्यार्थ्यांना तालुकास्तरावर ऑनलाईन प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यामध्ये लाभार्थी १७२५ पैकी १०४२ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

**<u>बांधकाम :</u>**

समग्र शिक्षा अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांना युडायस डाटा नुसार भौतिक सुविधा उपलब्ध करण्या करीता केंद्गशासना मार्फत निधी मंजूर करण्यात येतो. जसे की शाळांकरिता वर्ग खोली बांधकाम,मुलां-मुलींकरीता स्वच्छतागृह बांधकाम,पिण्याच्या पाण्याची सुविधा,शाळा करीता मुख्य दुरुस्ती,संरक्षक भिंत बांधकाम इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात येतात. केंद्ग शासनामार्फत ज्या उपक्रमास निधी मंजूर करण्यात येतो ते उपक्रम हाती घेण्यात येतात.

**<u>संयुक्त शाळा अनुदान :</u>**

- समग्र शिक्षा अंतर्गत संयुक्त शाळा अनुदान हे सर्वात वरचा वर्ग इयत्ता ८ वीचा असणाऱ्या शासकीय प्राथमिक शाळांना शाळेच्या पटसंख्येच्या निकषानुसार तत्वतः मंजूर करण्यात आलेले आहे. संयुक्त शाळा अनुदान हे शासकीय आदिवासी विकास विभागांने चालविलेल्या आश्रम शाळा,समाजकल्याण विभागाच्या शाळा,विद्या निकेतन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा(जिल्हा परिषद,नगर पालिका, नगर परिषद)साठी मंजूर आहे.सन २०१८-१९ मध्ये जिल्हयातील १०६५ निकष पात्र शाळांना एकूण १२९०५०००/- अनुदान गटशिक्षणाधिकारी यांचे मार्फत वर्ग करण्यात आलेले आहे.

**<u>अतिथी निदेशक :</u>**

- समग्र शिक्षा अंतर्गत सन २०१८-१९ मध्ये ज्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या उच्च प्राथमिक शाळांची (इयत्ता ६ वी ते ८ वी)ची पटसंख्या १०० पेक्षा अधिक आहे अशा निकषपात्र शाळांवर ११२ अतिथी निदेशक (कला,क्रिडा व कार्यानुभव) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.हे निदेशक एका आठवडयात १२ तासिका एका तुकडीसाठी याप्रमाणे विद्यार्थ्यांना अध्यापन करतात.

**<u>अस्मिता योजना :</u>**

ही योजना ११ ते १९ वयोगटातील जिल्हा परिषद शाळेत शिकत असणाऱ्या विद्यार्थीनीसाठी आहे. या योजनेत लाभार्थी विद्यार्थीनीना गावातील बचत गटा मार्फत माफक दरात म्हणजे रुपये ५/- दराने सॅनिटरी नॅपकिंग पुरवले जात आहे. जिल्हयात जिल्हा परिषद शाळेतील १०३०९ मुलींची या योजनेसाठी ऑनलाईन नोंदणी करण्यात आलेली आहे.

## ❖ शाळाबाहय मुलांसाठीची योजना :

1) समग्र शिक्षा अंतर्गत जिल्हयात शिक्षकांमधून शाळाबाहय मुलांचा शोध घेण्यासाठी बालरक्षक तयार करण्यात आले आहे.जिल्हयात 709 बालरक्षक कार्यरत आहेत. या बालरक्षकांचे गटस्तरावर प्रशिक्षण घेण्यात आलेले आहे.बालरक्षकांचीकामे खालील प्रमाणे आहेत.

2) शाळाबाहय विद्‌यार्थ्यांच्या ठिकाणांचा शोध घेणे.

3) १(कधीही शाळेत न गेलेले मुले) व २(सतत ३० दिवस गैरहजर असणारे विद्‌यार्थी) यांचा शोध घेणे.

4) शाळाबाहय मुले होण्याची कारणे शोधणे.

5) शाळाबाहय विद्‌यार्थ्यांना नियमित शाळेत आणण्यासाठी केलेले प्रयत्न.

6) शाळेत नियमित दाखल करताना आलेल्या अडचणी.

7) वयानुरुप विद्‌यार्थ्यांना शोधून वयानुरुप प्रवेश देणे.

8) हंगामी स्थलांतर रोखणे व जर शक्य झाले नाही तर त्यांना शिक्षण हमीपत्र देणे.

9) उपरोक्त बाबत फोटो,डॉक्युमेंटरी तयार करणे.

❖ आपण केलेल्या कामांच्या संदर्भात यशोगाथा केस स्टडी तयार करणे.

## शिक्षणहमी पत्र :-

शाळाबाहय मुले जर पालकांच्या स्थलांतरामुळे स्थलांतरीत होत असतील तर त्यांना मुख्याध्यापकां मार्फत शिक्षण हमी पत्र देण्याची कार्यवाही शाळास्तरावर करण्यात येत आहे. याचा पाठपुरावा मुख्याध्यापक व संबधित यंत्रणा करत आहे.

## **संगणक शिक्षण :**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २००३-०४ पासून सन २०१२-१३ या वर्षात जिल्हयात एकूण १६६ उच्च प्राथमिक शाळेत संगणक प्रयोगशाळा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. सदरील संगणक प्रयोगशाळेतून इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गातील विद्‌यार्थ्यांना इंग्रजी,गणित,विज्ञान,भूगोल या अभ्यासक्रमांच्या सी.डी./डी.व्ही.डी.उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक शाळेतील दोन शिक्षकांना संगणक हाताळण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.तसेच ५८ उच्च प्राथमिक शाळेतील प्रत्येकी तीन वर्ग डिजिटल करण्यात आले आहेत.

- ग्रामीण भागातील विद्‌यार्थ्यांना संगणकांच्या मदतीने अध्ययन - अध्यापन करणे सोयीचे व्हावे यासाठी या उपक्रमांचा वापर करण्यात येत आहे.

शाळा व्यवस्थापन समिती सदस्याचा प्रशिक्षण :

शिक्षक हक्क कायदयानुसार १०० टक्के मुले शाळेत दाखल करुन त्यांची उपस्थिती टिकवून त्यांना शिकविण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शिक्षण हक्क कादयात शाळा व्यवस्थापन समिती गठीत करुन कार्यान्वित करण्याची तरतूद आहे,शाळेचा विकास आराखडा त्यामध्ये विकासात्मक व शैक्षणिक गुणवतेशी संबधित बाबीचे नियोजन करण्याची जबाबदारी कायदयानुसार शाळा व्यवस्थापन समितीची आहे.

शाळा व्यवस्थापन समितीचा सक्षमीकरण्यासाठी राज्य पातळीवरुन वेळोवेळी प्रशिक्षणाचे आयोजन, पूरक वाचन,साहित्य शाळा व्यवस्थापन समितीचे कार्याबाबत या बाबत प्रत्येक वर्षी प्रत्येक शाळेतून शाळा व्यवस्थापन समितीचा कार्यरत सदस्यांना प्रशिक्षण दिले जातात.

**शिक्षक प्रशिक्षण :**

०८ जून २०१७ च्या शासन निर्णयानुसार प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन व त्यांचे मार्गदर्शक सूचनाची संपूर्ण जबाबदारी महाराष्ट्र विद्या प्राधिकरण पुणे यांची आहे. त्याची जिल्हास्तरावर अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा शैक्षणिक सातत्यपुर्ण व्यावसायिक विकास संस्था उस्मानाबाद यांची आहे.

- सदरचा प्रशिक्षणासाठी शिक्षकाचा मागणीनुसार शिक्षकांना प्रशिक्षण दिले जातात. त्यासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत शिक्षकांचा प्रशिक्षणासाठी तरतूद मंजूर केली जाती.

**संशोधन मूल्यामपन :** प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत चाचणीचा आयोजन.

शासन निर्णय २२ जून २०१५ व १४ जुलै २०१७ नुसार प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व व्यवस्थापनाचा सर्व माध्यमाचा मान्यता प्राप्त शाळामधील इयत्ता १ ली ते ८ वीचा सर्व विद्यार्थ्यांसाठी वर्षाभरात तीन शैक्षणिक प्रगती चाचण्याचे आयोजन करण्यात येते. सदर कार्यक्रमाचा अंमलबजावणी मध्ये पायाभूत चाचणी, संकलीत मूल्यमापन चाचणी-१ व संकलीत मूल्यमापन चाचणी २ घेतल्या जातात.

त्या-त्या वर्गाचा लागू असण्यास मूलभूत क्षमताचे जाणूक घेण्यासाठी व त्यानंतर त्यावर उपाय योजना राबविण्यासाठी अध्यानस्तर निश्चित करुन हा उपक्रम राबविला जातो.